**पंतप्रधान मॉरिशस भेटीवर (11-12 मार्च 2025)**

07 मार्च 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे मॉरिशसचे पंतप्रधान डॉ.नवीनचंद्र रामगोलम यांच्या निमंत्रणावरुन मॉरिशसच्या 12 मार्च रोजी होणाऱ्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून सहभागी होण्यासाठी 11-12 मार्च 2025 दरम्यान मॉरिशसच्या औपचारिक भेटीवर असतील. भारतीय नौदलाच्या एका जहाजासह भारतीय संरक्षण दलांची एक तुकडी या समारंभात सहभागी होईल. यापूर्वी वर्ष 2015 मध्ये पंतप्रधानांनी मॉरिशसला भेट दिली होती.

2. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मॉरिशसच्या राष्ट्रपतींची देखील भेट घेतील. पंतप्रधानांच्या सोबत चर्चा करतील आणि मॉरिशसमधील वरिष्ठ मान्यवर आणि राजकीय पक्षांचे नेते यांच्या सोबतच्या बैठकीत सहभागी होतील. पंतप्रधान भारतीय वंशाच्या सदस्यांसोबत संवाद साधतील आणि भारताच्या अनुदान सहाय्यातून उभारण्यात आलेले नागरी सेवा महाविद्यालय आणि क्षेत्र आरोग्य केंद्राचे उद्घाटन करतील. या दौऱ्यादरम्यान अनेक सामंजस्य करारांची देवाणघेवाण केली जाईल.

3. भारत आणि मॉरिशस यांमध्ये सामायिक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नागरिक परस्पर संबंधाच्या दृष्टीने दृढ आणि निकटम संबंध राहिले आहेत. तसेच, मॉरिशस हा भारताचा दृष्टिकोन SAGAR (सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल इन रिजन) साठीचा महत्वपूर्ण घटक आहे.

4. या भेटीमुळे भारत आणि मॉरिशस यांच्यातील मजबूत आणि शाश्वत संबंध दृढ होतील आणि सर्व क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंध वाढविण्यासाठी दोन्ही देशांची सामायिक वचनबद्धता अधोरेखित होईल.

नवी दिल्ली

07 मार्च 2025